## सुधारित वास्तविक खर्च याचिका वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९, प्रस्तावित वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१९-२० आणि एमवायटी याचिका वित्तीय वर्ष २०२०-२१ ते वित्तीय वर्ष २०२४-२५

### १.) कार्यकारी सारांश:

### १.१) प्रस्तावना:

अमरावती पॉवर ट्रांन्समीशन कंपनी लिमिटेड **(एपीटीसीएल)** एक आंतर राज्य पारेषण परवाना धारक महाराष्ट्रामध्ये असून पारेषण परवाना क्रं. ३/२०१० मा. आयोग यांच्या आदेश दिनांक ३० डिसेंबर, २०१० आणि सुधारित आदेश दिनांक ०४ ऑगस्ट, २०१४ प्रमाणे मान्यता प्राप्त आहे. वीज अधिनियम २००३ **(इए)** प्रमाणे, एपीटीसीएल ही पारेषण परवाना धारक असून तिला वीज अधिनियम, २००३ कलम ६१, ६२ आणि ६४ मध्ये नमुद केलेल्या कार्यपद्धतीनुसार आणि त्यातील नियमन विनीयमनुसार त्यांना त्याचे एकुण आवश्यक महसुल **(एआरआर)** आणि दर याचिका सादर करणे आवश्यक आहे, त्यानुसार

हा भाग, एपीटीसीएल यांनी मान्यतेसाठी दाखल केलेल्या वास्तविक खर्च याचिका वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९, प्रस्तावित वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१९-२० आणि बहुवर्षिय दर नियमन (एमवायटी) अधिनियम २०१५ नुसार आणि **(एमवायटी)** अधिनियम २०१९ नुसार एआरआर नियंत्रण कालावधी वित्तीय वर्ष २०२०-२१ ते वित्तीय वर्ष २०२४-२५ करीता, प्रस्तुत करतो.

### १.२) वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९

### १.२.१) एआरआर वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९

एपीटिसीएलने वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९ साठी ऑडिट केलेल्या खात्यांना वास्तविक खर्च आणि एमईआरसी (एमवायटी) अधिनियम २०१५ नुसार जेथे लागु असेल तेथे एआरआरची अमंलबजावणी केलेली आहे. माननीय आयोगाद्वारे मंजुर २०१७ च्या आदेश क्रमांक १९७ दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ मध्ये विविध किंमती घटकांची तपशीलवार तुलना केलेली आहे. वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१७-१८आणि वित्तीय वर्ष २०१८-१९ करीता केलेल्या प्रस्तावित एआरआरचे सारांश खाली प्रस्तुत केलेले आहेत:

**तक्ता क्र.१: सारांश वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९ (कोटी रुपये)**

| अ.क्र. | तपशील | मंजुर | प्रत्यक्ष | निव्वळ भांडवल नफा/तोटा | फरक | मंजुर | प्रत्यक्ष | निव्वळ भांडवल नफा/तोटा | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वित्तीय वर्ष २०१७-१८ | | | | वित्तीय वर्ष २०१८-१९ | | | |
| १ | संचालन व देखभाल खर्च | २.५३ | ३.४४ | २.८३ | ०.३० | २.६५ | ३.४० | २.९० | ०.२५ |
| २ | घसारा खर्च | १४.१४ | १४.२१ | १४.२१ | ०.०७ | १४.३४ | १४.३१ | १४.३१ | -०.०३ |
| ३ | दिर्घकालीन कर्जावरील व्याज | २१.०० | ३३.०१ | ३३.०१ | १२.०१ | १९.२१ | १९.४४ | १९.४४ | ०.२३ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ०.९९ | १.०० | ०.३३ | -०.६६ | १.५२ | १.३३ | ०.४४ | -१.०७ |
| ५ | आयकर | ६.४७ | २.८४ | २.८४ | -३.६३ | ६.४७ | ५.३६ | ५.३६ | -१.११ |
| ६ | आकस्मिक राखीव निधीकरीता वर्गणी | २.०० | २.०० | २.०० | ०.०० | ०.६८ | ०.६८ | ०.६८ | ०.०० |
| ७ | **एकुण महसुल खर्च** | **४७.१४** | **५६.५०** | **५५.२२** | **८.०८** | **४४.८७** | **४४.५१** | **४३.१३** | **-१.७४** |
| ८ | इक्विटी कॅपिटल वर परतावा | १०.४२ | १०.४४ | १०.४४ | ०.०२ | १०.५७ | १०.५४ | १०.५४ | -०.०३ |
| ९ | **स्थूल एकुण आवश्यक महसूल** | **५७.५६** | **६६.९४** | **६५.६७** | **८.१०** | **५५.४४** | **५५.०५** | **५३.६७** | **-१.७७** |
| १० | वजा: वीज दरा व्यतिरीक्त उत्पन्न | ०.२९ | ०.२५ | ०.२५ | -०.०४ | ०.१९ | ०.०६ | ०.०६ | -०.१३ |
| ११ | अधिक: प्रोत्साहन | ०.०० | १.०१ | १.०१ | १.०१ | ०.०० | ०.९६ | ०.९६ | ०.९६ |
| १२ | **निव्वळ एकूण आवश्यक महसुल** | **५७.२७** | **६७.७०** | **६६.४३** | **९.१६** | **५५.२४** | **५५.९५** | **५४.५६** | **-०.६८** |
| | | | | | | | | | |
| | **मागील कालावधीतील अंतर** | | | | | | | | |
| १३ | अधिक: अंतर/(अधिक्य) वित्तीय वर्ष २०१०-११ ते वित्तीय वर्ष २०१४-१५ | | | | | ३३.२६ | ३३.२६ | ३३.२६ | ०.०० |
| १४ | अधिक: अंतर/(अधिक्य) वित्तीय वर्ष २०१५-१६ ते वित्तीय वर्ष २०१६-१७ | | | | | १४.०४ | १४.०४ | १४.०४ | ०.०० |
| १५ | अधिक: अंतर/(अधिक्य) वित्तीय वर्ष २०१७-१८ | | | | | २.३८ | ०.०० | ०.०० | -२.३८ |
| १६ | **मागील कालावधीच्या अंतरासह एकुण आवश्यक महसुल** | **५७.२७** | **६७.७०** | **६६.४३** | **९.१६** | **१०४.९२** | **१०३.२५** | **१०१.८६** | **-३.०६** |

**१.२.२) महसुलातील अंतर वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९**

वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९ साठीची महसुल वसुली माननीय आयोगाच्या २०१६ चा खटला क्र.९१ दिनांक २२ जुलै, २०१६ आणि २०१८ चा खटला क्र. २६५ दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ आधारे निश्चित केलेल्या राज्यांतर्गत पारेषण शुल्क आकारणी मानली गेली आहे. त्यानुसार, वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९ मध्ये वसुल झालेले महसुल आणि मागील अंतर यांचा विचार करून एपीटीसीएलने दावा केलेले महसुल अंतर खाली दिल्याप्रमाणे आहेत.

**तक्ता क्र.२: महसुलातील अंतर वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९ (कोटी रुपये)**

| अ.क्र. | तपशील | वित्तीय वर्ष २०१७-१८ | वित्तीय वर्ष २०१८-१९ |
|---|---|---|---|
| १ | एकुण एआरआर | ६६.४३ | १०१.८६ |
| २ | पारेषण दरापासून एआरआर | ५४.८९ | ८३.४९ |
| ३ | महसुलातील अंतर | ११.५४ | १८.३७ |

**१.३) तात्पुरता वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१९-२०**

**१.३.१) एआरआर वित्तीय वर्ष २०१९-२०**

एमईआरसी (एमवायटी) अधिनियम २०१५ च्या तरतुदीनुसार, अस्थायी समायोजन पारेषण परवाना धारकाच्या कामगिरीची तुलना एमवायटी ऑर्डरमधील मंजुर अंदाजानुसार केली आहे. त्यानुसार, २०१७ चा खटला क्रं. १९७ दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ च्या एमईआरसीच्या मंजुर एआरआरची तुलना वित्तीय वर्ष २०१९-२० च्या पहिल्या सहामाहीत कामगिरीवर आधारित सुधारित पुर्वानुमानासह केली आहे आणि इतर घटक खालील दिलेल्या तक्त्यात दर्शविले आहेत.

**तक्ता क्र. ३: सारांश तात्पुरता वास्ताविक खर्च वित्तीय वर्ष २०१९-२० (कोटी रुपये)**

| तपशील | मंजुर | प्रत्यक्ष एच १ | अंकेक्षित एच २ | अंकेक्षित |
|---|---|---|---|---|
| संचालन व देखभाल खर्च | २.७७ | १.४१ | २.१४ | ३.५५ |
| घसारा | १४.४३ | ७.१६ | ७.१६ | १४.३१ |
| दिर्घकालीन कर्जावरील व्याज | १७.५५ | ८.७४ | ८.७४ | १७.४९ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ०.९१ | ०.४६ | ०.४६ | ०.९२ |
| आयकर | ६.४७ | ०.०० | ५.३६ | ५.३६ |
| आकस्मिक राखीव निधीकरीता वर्गणी | ०.६८ | ०.३४ | ०.३४ | ०.६८ |
| **एकुण महसुल खर्च** | **४२.८२** | **१८.११** | **२४.१९** | **४२.३०** |
| इक्विटी कॅपिटल वर परतावा | १०.६४ | ५.२७ | ५.२७ | १०.५४ |
| **एकुण आवश्यक महसूल** | **५३.४७** | **२३.३८** | **२९.४६** | **५२.८४** |
| वजा: वीज दरा व्यतिरीक्त उत्पन्न | ०.२५ | ०.०२ | ०.०२ | ०.०३ |
| **निव्वळ एकुण आवश्यक महसुल** | **५३.२१** | **२३.३६** | **२९.४५** | **५२.८१** |

**१.३.२) महसुलातील अंतर वित्तीय वर्ष २०१९-२०**

वित्तीय वर्ष २०१९-२० साठीचे महसुल वसुली माननीय आयोगाने २०१८ चा खटला क्रं. २६५ दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ च्या आदेशानुसार ठरविलेल्या आंतर राज्यीय पारेषण शुल्काच्या आधारे मानले गेले आहे. त्यानुसार, वित्तीय वर्ष २०१९-२० दरम्यान वसुल झालेल्या अंदाजित महसुलाचा विचार करता, एपीटीसीएलने दावा करीत असलेल्या महसुलातील अंतर खाली दिल्याप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ४: महसुलातील अंतर वित्तीय वर्ष २०१९-२० (कोटी रुपये)**

| तपशील | वित्तीय वर्ष २०१९-२० |
|---|---|
| एकुण एआरआर | ५२.८१ |
| पारेषण दरापासून एआरआर | ५३.२१ |
| **महसुलातील अंतर/(अधिक्य)** | **-०.४०** |

**१.४) बहुवर्षिय दर याचिका नियंत्रण कालावधी वित्तीय वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५**

एमईआरसी (एमवायटी) अधिनियम २०१९ च्या आधारे एपीटीसीएल यांनी वित्तीय वर्ष २०२०-२१ ते वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या बहुवर्षिय दर नियंत्रण कालावधीसाठी अंदाज पत्रके तयार केली आहेत. या नियंत्रण कालावधीसाठी एआरआर सारांश खाली दर्शविलेल्या प्रमाणे आहे.

**तक्ता क्र.५: एकुण आवश्यक महसूल एमवायटी नियंत्रण कालावधी (कोटी रुपये)**

| तपशील | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|
| संचालन व देखभाल खर्च | ४.७१ | ४.९१ | ५.०९ | ५.२८ | ५.४९ |
| घसारा खर्च | १४.३१ | १४.३१ | १४.३१ | १४.३१ | १४.३१ |
| दिर्घकालीन कर्जावरील व्याजासह वित्त पूरवठा आणि पुनवित्त शुल्क | १५.६६ | १३.८४ | १२.०२ | १०.२० | ८.३७ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १.३१ | ०.८६ | ०.८४ | ०.८२ | ०.८० |
| आयकर | | | | | |
| आकस्मिक राखीव निधीकरीता वर्गणी | ०.६८ | ०.६८ | ०.६८ | ०.६८ | ०.६८ |
| **एकूण महसुल खर्च** | **३६.६७** | **३४.६०** | **३२.९४** | **३१.२८** | **२९.६५** |
| इक्विटी कॅपिटल वर परतावा | १२.१३ | १२.१३ | १२.१३ | १२.१३ | १२.१३ |
| **स्थूल एकुण आवश्यक महसूल** | **४८.८१** | **४६.७३** | **४५.०७** | **४३.४१** | **४१.७८** |
| वजा: वीज दरा व्यतिरीक्त उत्पन्न | ०.०३ | ०.०३ | ०.०३ | ०.०३ | ०.०३ |
| **निव्वळ एकुण आवश्यक महसूल** | **४८.७८** | **४६.७०** | **४५.०४** | **४३.३८** | **४१.७५** |
| अधिक: वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१७-१८ साठी अंतर/(अधिक्य) | ११.५४ | | | | |
| अधिक: वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१८-१९ साठी अंतर/(अधिक्य) | १८.३७ | | | | |
| अधिक: वित्तीय वर्ष २०१९-२० च्या एआरआर साठी अंतर/(अधिक्य) | -०.४० | | | | |
| वित्तीय वर्ष २०१७-१८ ते वित्तीय वर्ष २०१८-१९ साठी वहन खर्च व धारण खर्च | ६.४० | | | | |
| **मागील कालावधीच्या अंतरासह एकूण वार्षिक आवश्यक महसूल** | **८४.६९** | **४६.७०** | **४५.०४** | **४३.३८** | **४१.७५** |

**१.५) माननीय आयोगास प्रार्थना**

एपीटीसीएल आदरपूर्वक सुधारित याचिकेद्वारे अर्ज सादर करतो आणि माननीय आयोगास प्रार्थना करतो की:

ए. वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९, तात्पुरता वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१९-२० एमवायटी अधिनियम २०१५ च्या नुसार आणि नियंत्रण कालावधीसाठी एकुण आवश्यक महसुल वित्तीय वर्ष २०२०-२१ ते वित्तीय वर्ष २०२४-२५ एमवायटी अधिनियम २०१९ नुसार, मान्यतेसाठी याचिका दाखल करण्याबाबत.

बी. एमवायटी अधिनियम २०१५ नुसार, मागील कालावधीतील अंतरासह एआरआर वित्तीय वर्ष २०१७ -१८ आणि वित्तीय वर्ष २०१८-१९ मधील अधिक पारेषण उपलब्धतेसाठी प्रोत्साहन समाविष्ट करुन एपीटीसीएलला मान्यता प्रदान करावी.

सी. तात्पुरता वास्तविक खर्च वित्तीय वर्ष २०१९-२० ला एमवायटी अधिनियम २०१५ नुसार, या याचिकेमध्ये मान्यता प्रदान करावी.

डी. कर्जाचे पुर्नवित्त करण्यासाठी , एपीटीसीएलने सादर केलेल्या याचिकेत दर्शविल्यानुसार दावा केलेल्या वित्तीय शुल्कास मंजुरी देणे.

ई. एमवायटी अधिनियम २०१९ नुसार नियंत्रीत कालावधी वित्तीय वर्ष २०२०-२१ ते वित्तीय वर्ष २०२४-२५, करीता प्रस्तावित एआरआर मंजूर करावा.

एफ. याचिकेत सादर केल्याप्रमाणे पारेषण शुल्कामधील मागील अंतर वसुल करण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

जी. कोणतीही नकळत वगळणे, चुक, कमतरता, गोळाबेरीज असल्यास माफी दयावी आणि एपीटीसीएलला हया याचिकेत भविष्यातील तारखेला आवश्यकतेनुसार जोडणे/ बदलने/ सुधारित करणे, इत्यादी सादर करण्यासाठी परवानगी मिळावी; आणि

एच. या प्रकरणाच्या परिस्थिती व तथ्यात योग्य व ऊचित वाटल्यास असे अन्य आदेश पारित करावे;